गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक २४८ वा ● सोमवार २९ जानेवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 248 | Date : 29/01/2024 | blow :Monday | Page 4 | Price 4

### १ फेब्रुवारीपासून एल्गार पुकारणार
## ‘शपथपत्र देऊन जात बदलता येते का?’ छगन भुजबळांचा सवाल

मुंबई : राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी नेत्यांची बैठक संपन्न झाली. या बैठकीत मराठा आरक्षणाच्या अध्यादेशाचा निषेध करण्यात आला. तसेच १ फेब्रुवारीपासून राज्यभर आंदोलन पुकारणार असल्याची घोषणा करण्यात आली. कॅबिनेट मंत्री आणि ओबीसी नेते यांनी ओबीसींचा एल्गार पुकारला असून मराठा आरक्षणाच्या अध्यादेशाच्या विरोधात आंदोलन करणार असल्याची घोषणा केली.

मराठा समाजाला ओबीसी आरक्षणात समावेश करण्याला तसेच त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही शपथपत्रावर ओबीसीत सामील करून घेण्याला राज्यातील ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शविला आहे. राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सरकारच्या निर्णयाविरोधात आज ओबीसी नेत्यांची बैठक आपल्या निवासस्थानी बोलविली होती. या बैठकीनंतर पत्रकार परिषद घेऊन सरकारच्या अध्यादेशाचा विरोध केला. तसेच आगामी काळात आंदोलनाची दिशा कशी असेल, याबाबत भूमिका मांडली. १ फेब्रुवारीला संपूर्ण राज्यात सर्व आमदार, खासदार आणि तहसीलदार यांच्या निवासस्थानाबाहेर मोठ्या संख्येने एकत्र येऊन ओबीसी समाजाने आंदोलन करावे, असे आवाहनही छगन भुजबळ यांनी केले.



त्याचबरोबर मराठवाड्यातून सुरुवात करत संपूर्ण राज्यात ओबीसींची एल्गार यात्रा काढली जाणार आहे, अशी माहितीदेखील त्यांनी दिली.

छगन भुजबळ यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत आजच्या बैठकीत घेतलेल्या ठरावांची माहिती दिली. ओबीसी समाजाला फसविण्याचे काम सुरू आहे. सगेसोयरे याची स्पष्ट व्याख्या असताना त्यात बेकायदेशीर बदल का केले जात आहेत? देशात कुठेही शपथपत्र देऊन जात बदलता येत नाही. ओबीसींच्या आरक्षणात मराठा समाजाला घेऊन ओबीसींना बाहेर ढकलण्याचे काम सुरू आहे, अशी खंत छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. १ फेब्रुवारीच्या आंदोलनानंतर ३ फेब्रुवारी रोजी अहमदनगर येथे राज्यव्यापी ओबीसी एल्गार मेळावा आयोजित करण्यात येणार आहे, अशीही माहिती भुजबळ यांनी दिली.

या बैठकीत तीन ठराव मांडण्यात आले. महाराष्ट्र शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलून मराठा समाजाला । पान २ वर

## नाट्य रंगभूमीला लोकाश्रय मिळाला पाहिजे : पालकमंत्री चंद्रकांत पाटील



सोलापूर/प्रतिनिधिः नाट्य रंगभूमी पुढे येण्यासाठी लोकाश्रय मिळावा. रसिकांनी कलाकारांच्या पाठीशी उभे राहावे, ज्यायोगे नाटकांचा सुवर्णकाळ पुन्हा एकदा अनुभवता येईल असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले. १०० व्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलनाचा हस्तांतरण सोहळा नॉर्थकोट मैदान, सोलापूर येथे आज रविवार दिनांक २८ जानेवारी २०२४ रोजी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला.यावेळी अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्ष जब्बार पटेल, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके, सिने कलाकार किशोर महाबोले, नीलम शिर्के सामंत, दीपक करंजीकर,अशोक हांडे, अतुल परचुरे, सोलापूर विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा,प्रा. शिवाजी सावंत, कार्याध्यक्ष प्रकाश यलगुलवार, प्रमुख कार्यवाह विजयदादा साळुंके , कार्याध्यक्ष अविनाश महागावकर, समन्वयक मोहन डांगरे, स्वागत सचिव प्रशांत बडवे यांच्यासह सोलापूर जिल्ह्यातील नाट्य परिषदेच्या शाखेचे अध्यक्ष उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री श्री पाटील म्हणाले,मराठी रंगभूमी आणि मराठी रंगकर्मी यांनी या देशातील रंगभूमी टिकविण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी रंगभूमी सर्वोत्तम असल्याने ती टिकविणं, जगविणं आपली जबाबदारी आहे.संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेच्या हृदयात नाटकाचा भाव पोहोचून रसिकांनी तिकिट काढून नाटक पाहावे आणि महाराष्ट्रात या माध्यमातून नाट्य रसिकांची संख्याही वाढावी अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली. विद्यापीठातून युवा कलावंत निर्माण व्हावेत यासाठी शासनाकडून विद्यापीठाच्या कला विभागास अनुदान देण्यात येते. कला विभागाला ज्यादा चा निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न करण्यात येईल असेही पालकमंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले.

संमेलनाध्यक्ष डॉ.जब्बार पटेल म्हणाले, राजश्री शाहू महाराज यांनी त्यांच्या काळात. राज्यातील कलाकारांना तसेच संगीताला कलाक्षेत्राला राजाश्रय दिला. तसा राजआश्रय आता मिळावा. । पान २ वर

### सर्वोच्च न्यायालयातील डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या पुतळ्याला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले अभिवादन



मुंबईः सर्वोच्च न्यायालयाच्या प्रांगणात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नुकत्याच उभारण्यात आलेल्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करुन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी विनम्र अभिवादन केले.यावेळि सर्वोच्च न्यायालयाच्या वास्तुला ना.रामदास आठवले यांनी भेट दिली. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश न्यायमूर्ती मा. धनंजय चंद्रचुड यांची ना.रामदास आठवले सदिच्छा भेट घेतली.तसेच सर्वोच्च न्यायालयातील बार असोसिएशनला भेट देऊन वकिलांशी चर्चा केली.तसेच वृध्द आणि दिव्यांग वकिलांना ट्राय सायकल आणि व्हिलचेअर देण्याचे आश्वासन ना.रामदास आठवले यांनी यावेळी दिले. यावेळी रिपाई चे ॲड.मिथिलेश पांडे उपस्थित होते.

## नितीश कुमार नवव्यांदा बिहारच्या मुख्यमंत्रीपदी!

बिहार : बिहारमध्ये कालपासून राजकीय उलथापालथ सुरू आहे. आज या राजकीय घडामोडींना पूर्णविराम लागला आहे. नितीश कुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. नितीश कुमार यांनी भारत माता की जय आणि जय श्री रामच्या घोषणा देत शपथ घेतली. तेव्हा जीतन राम मांझी, चिराग पासवान, सम्राट चौधरी, जेपी नड्डा उपस्थित होते. नितीश यांच्यासह जनता दल (युनायटेड) नेते विजय कुमार चौधरी आणि बिजेंद्र प्रसाद यादव आणि भाजप नेते सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा यांनीही कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली. सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा हे बिहारचे उपमुख्यमंत्री होण्याची शक्यता वर्तवली जातेय.



बिहारमधील बदललेल्या राजकीय समीकरणात नितीशकुमार यांना आता नवे मंत्रिमंडळ मिळणार असल्याने रातोरात आरजेडीचे मंत्री मंत्रिमंडळातून बाहेर पडले आहेत. नितीश कुमार यांनी राजदशी असलेली आपली युती तोडली असून मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. गेल्या दोन वर्षांपासून महाआघाडीच्या रुपात संयुक्त जनता दल, राष्ट्रीय जनता दल (राजद), काँग्रेस आणि डावे सत्तेत होते. मात्र, नितीश कुमार यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्यामुळे बिहारमधील सरकार । पान २ वर

## ‘भारत जोडो न्याय यात्रे’ला सुरक्षा पुरवावी!
### मल्लिकार्जुन खरगे यांची ममता बॅनर्जीना पत्र लिहून विनंती




नवी दिल्लीः पश्चिम बंगालमध्ये दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर रविवारपासून पुन्हा सुरू होणाऱ्या ‘भारत जोडो न्याय यात्रे’दरम्यान समाजकंटक समस्या निर्माण करू शकतील अशी चिंता काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी व्यक्त केली आहे. खरगे यांनी शनिवारी राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना पत्र लिहून यात्रेच्या तसेच काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यासह अन्य सहभागींच्या सुरक्षेसाठी योग्य निर्देश द्यावेत अशी विनंती केली. काही समाजकंटक राज्याच्या प्रशासनाची प्रतिमा डागाळण्याचा प्रयत्न करतील किंवा यात्रेमध्ये व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करतील असे खरगे यांनी लिहिले आहे. पश्चिम बंगालमध्ये येण्यापूर्वी शेजारील राज्यामध्ये (आसाम) यात्रेच्या मार्गात अडथळे आणण्याचा प्रयत्न झाला याचा उल्लेख त्यांनी केला आहे. । पान २ वर

## अधिसूचनेच्या माहितीनंतर छगन भुजबळ यांचा गैरसमज दूर होईल : मुख्यमंत्री

वाई : छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाच्या अधिसूचनेची माहिती घेतल्यानंतर त्यांचा गैरसमज दूर होईल असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी साताऱ्यातील महाबळेश्वर येथे म्हटले आहे. किल्ले प्रतापगड (ता. महाबळेश्वर) येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे माध्यमांशी बोलत होते. यावेळी खा. डॉ. श्रीकांत शिंदे, आ. मकरंद पाटील, आ. महेश लांडगे, आ. नितेश राणे,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस अधीक्षक समीर शेख, मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, अप्पर पोलीस अधिक्षक आंचल दलाल, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम जाधव आदी उपस्थित होते. इतरांच्या हक्काला बाधा न पोहचत आम्हाला आरक्षण मिळावं ही जरांगे पाटील यांची मागणी होती. अधिसूचनेत सर्व बाबी स्पष्ट पणे नमूद केल्या आहेत. ही अधिसूचना इतर समाजाला सुद्धा मार्गदर्शक ठरेल. छगन भुजबळ आमचे सहकारी आहेत त्यांनी या अधिसूचनेची माहिती घेतल्या नंतर त्यांचाही याबाबतचा गैरसमज दूर होईल. मराठा समाजाला आरक्षण देत असताना इतर समाजाला धक्का न लावता टिकणारे आरक्षण देणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

शनिवारी मराठा आरक्षणाचा जो निर्णय घेतला तो कुणबी नोंदी असताना प्रमाणपत्र मिळत नव्हती त्यांना प्रमाण पत्र मिळण्यासाठी होता. नारायण राणेंनी केलेल्या विरोधाबाबत बोलताना ही अधिसूचना जुन्या कुणबी नोंदी ज्यांच्या आहेत त्यांच्या साठी आहे.मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या निर्णयावर मागासवर्गीय आयोग एम्परिकल डेटा गोळा करण्याचे काम करत आहेत त्या मध्ये ३६ जिल्ह्यांमध्ये सुरू आहे. मराठा समाज शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्या मागास कसा आहे हे त्या डेटा मधून येईल. देवेंद्र फडणवीस असताना जे आरक्षण दिलं होत त्यात त्रुटी राहिल्या होत्या त्याबाबत अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे. त्या नंतर विशेष अधिवेशन घेऊन टिकणार आरक्षण राज्यसरकार देणार आहे. या वेळी इतर कोणावर अन्याय होणार नाही. कुणबी आरक्षणाचा विषय वेगळा आहे आणि मराठा समाजाला टिकणार आरक्षण द्यायचा विषय वेगळा आहे. कुणीही गैरसमज करून घेऊ नये. मराठा समाजाला टिकणार आरक्षण देण्याचा निर्णय होण्यासाठी मागासवर्ग आयोग नेमला आहे.

मराठा समाजाने अनेकांना संधी दिली, मोठं केलं. मात्र त्यांनी संधीचे सोन केलं नाही. त्यावेळी मराठा समाजाला वंचित ठेवले. या सर्वेक्षणाच्या कामावर प्रश्न चिन्ह निर्माण करणे हीच त्यांची खरी वृत्ती दिसून येते. त्यांनी कोणत्या ना कोणत्या कारणाने अडथळा आणायचे काम करतायत. त्यामुळे सर्व पक्षांनी सर्वेक्षणाला सहकार्य करावे अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

### अक्कलकोटचे प्रगतशील शेतकरी पाटील व बिराजदार आयोजित
## हुरडा महोत्सवाचे आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते उद्घाटन



**अक्कलकोटचे प्रगतशील शेतकरी प्रमोद पाटील व शिवराज बिराजदार आयोजित हुरडा महोत्सवास गुरुवारी पासून प्रारंभ झाला असून याचे उद्घाटन करताना अक्कलकोटचे विद्यमान दमदार युवा आमदार सचिन कल्याणशेट्टी यावेळी श्री म.नि.प्र अभिनव शिवलिंग महास्वामीजी विरक्त मठ मादन हिप्परगा , बसवलिंग महास्वामीजी अक्कलकोट, युवा उद्योजक किरण हंचाटे, महेश हिंडोळे, आयोजक प्रमोद पाटील व संयोजक शिवराज बिराजदार आदी.**

### दुसऱ्याच्या सुख दुखःत सामिल होऊन माणूसकीचे दर्शन घडविणाऱ्यांच्या पाठीशी ईश्वर आशीर्वाद असतो : आमदार सचिन कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधिः आज समाजात अनेक परोपकारी माणस भेटतात ते नेहमीच दुसऱ्यांच्या सुख दुखःत सामिल होऊन माणूसकीचे दर्शन घडवत असतात.अशीच परोपकारी माणस आज समाजात पुढे येत असतात.अशा माणसांच्या पाठीमागेच ईश्वर आशीर्वाद असल्याचे मत भाजपाचे सोलापूर जिल्हाध्यक्ष दमदार युवा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

अक्कलकोट येथे उद्योजक,प्रगतशील शेतकरी प्रमोद पाटील यांच्या शेतात व संयोजक युवा नेता शिवराज अण्णा बिराजदार यांचे हुरडा महोत्सवाचे उद्घाटन करताना आमदार कल्याणशेट्टी हे बोलत होते.वर्षाकाठी जवळपास पाच लाख रुपयाचे उत्पन्न घेता स्वतःच्या व्यापार व्यवसायाकडे दुर्लक्ष करून दररोज सुमारे तीनशे ते चारशे पेक्षा जास्त लोकांना मोफत हुरड्याचा आस्वाद देऊन दरवर्षी जवळपास महिनाभर हुरडा महोत्सव गेल्या १५ वर्षापासुन सतत सुरू असलेल्या प्रमोद पाटील व शिवराज बिराजदार हुरडा महोत्सवाला अक्कलकोट तालुका सह जिल्हा भरातुन व कर्नाटकातून वाढता प्रतिसाद मिळत असतो.

हे हुरडा महोत्सव चे यंदाच्या १६ वे वर्ष असुन प्रमोद पाटील व शिवराज बिराजदार स्वतः येणाऱ्या सर्वांना आस्थेने हुरडा खाऊ घालतात.प्रमोद पाटील हे व्यापारी असुन त्यांची जवळपास एकुण ४५ एकर शेती आहे. त्यामध्ये द्राक्षे, डाळिंब, बोर , ऊस,तूर, उडीद,शेंवती फुल शेती तसेच विविध ज्वारीचे अनेक नमुने आदी पीके घेत असुन या वर्षी जवळपास ४ ते ५ एकर फक्त हुरडासाठी दरवर्षी राखुन ठेवलेले आहे.हुरडा मार्केटिंग केले जाते.राहिलेल्या ज्वारीचे बी व वाळलेल्या हुरड्याची रास करून नागरिकांना मोफत दिले जाते.सुरती, कचकची, नरीबाला, फुले ,उत्तरा गुळबंडी आदी जातीचे हुरडा असतात.दरवर्षी जानेवारी मध्ये हुरडा महोत्सवास सुरू होते असुन ते महिना सव्वा महिना सुरू असते. या वर्षी २५ जानेवारी पासून सुरू झाला आहे.

यासाठी राजकिय, सामाजिक, सर्व समाज घटकातील, सर्व धर्मीय उपस्थित राहतात.स्वतःचे व्यापार व्यवसाय सोडुन प्रमोद पाटील व शिवराज बिराजदार हुरडा सेवा करतात.बाळप्पा भडोळे व नागराज कुंभार यासह चार जण कणसे सोलुन देतात तर चार महिला कणसे काढुन आणतात.कणसे चोळण्यासाठी

स्नेह बंधुभाव वाढावा या उद्देशाने गेल्या १५ वर्षापासुन हुरडा महोत्सवाचे आयोजन केले जाते.यंदाच्या १६ वे वर्ष असून, दररोज सुमारे ४०० ते ५०० कुंटुंबिय लांबलांबुन येऊन याचा लाभ घेतात. –संयोजक शिवराज बिराजदार

सर्वच बाबतीत आर्थिक दृष्टिकोनातून पाहुन चालत नाही.निस्वार्थ भावनेने हुरडा खायला घातल्याने एक प्रकारचे मनाला शांती मिळते.दैव आर्शिवादाने सगळे सुरळीत आहे. बोअरला भरपूर पाणी आहे. विहीरतही मुबलक पाणी आहे.यंदा पाऊस कमी झाल्याने पाणी कमी आहे.जे येईल त्यांचे स्वागत आहे.त्यांना हुरडा खाऊ घालतो.लोकांच्या इच्छा शक्तीने हे साध्य होत.पाणी सोडतो.पक्षापासुन संरक्षण करतो. –प्रमोद पाटील

स्वतः प्रमोद पाटील हे हातमोजे वापरून घोळ काढण्यासाठी चाळणीचा वापर केला जातो. सोलापूर, मुंबई, पुणे, कर्नाटकातून देखील पुष्कळ जण, परदेशी पर्यटक येत असतात. काही नातेवाईक त्यांच्या नातेवाईक यांना परदेशात हुरडा पाठवित असतात.काही शाळांचे गेटटुगेदर या हुरडा महोत्सव निमित्त होतात. सर्वांमध्ये स्नेहभाव वाढावा, सहकार्य भावना वाढावा या उद्देशाने हुरडा महोत्सव सुरू केले. । पान २ वर

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### निकालावर संशय

समाजीतल गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी विविध कायदे केले जातात. हे कायदे अस्तित्वात येत असताना ‘कडक’ असतात, पण ते लागू होत असतानाच सर्वात पहिल्यांदा त्यातील पळवाटा शोधल्या जातात. या पळवाटा शोधून अलगदपणे पळ काढणारा कुणाच्या हाती येत नाही आणि कायद्याच्या कसोटीवर ते सिध्दही करता येत नाही, हे वास्तव कोणीच नाकारू शकत नाही. गेल्या आठवड्यात विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिलेला निकाल वेगळे काय सांगतो? बहुचर्चित आमदार अपात्रतेचा निकाल अलीकडे जाहीर झाला. शिवसेनेमध्ये झालेल्या बंडानंतर ठाकरे तसेच शिंदे गटाने परस्परविरोधात आमदार अपात्रतेच्या याचिका दाखल केल्या. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठाने या सत्तासंघर्षाचा निकाल देताना अपात्रतेचा मुद्दा विधानसभा अध्यक्षांकडे वर्ग केला. त्यानुसार नार्वेकर यांनी यावर सुनावणी घेतली. त्यानंतर दोन्ही गटांच्या याचिका फेटाळल्या. हा निर्णय देताना २०१३ तसेच २०१८ साली झालेली शिवसेनेची राष्ट्रीय कार्यकारिणी, प्रतिनिधी सभा आणि पंचवार्षिक निवडणूक तसेच प्रामुख्याने यावेळी करण्यात आलेली घटना दुरुस्ती अमान्य करीत नार्वेकर यांनी शिवसेनेच्या १९९९ च्या पक्षघटनेला आधार मानले. त्याच अनुषंगाने विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीच शिवसेना असल्याचे त्यांनी सांगितले. ठाकरे गटाने याबाबत तीव्र प्रतिक्रिया देताना सर्वोच्च न्यायालयात जाण्याचे ठरविले. त्यामुळे ही लढाई उच्चतम न्यायमंदिरात लढली जाईल हे निश्चित होते, पण पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी न्यायमंदिराबरोबरच हा वाद न्यायासाठी थेट लोकांसमोर नेला. अलीकडे त्यांनी महापत्रकार परिषद घेतली आणि नार्वेकर यांचा निकाल कसा चुकीचा होता हे सांगितले. यासाठी त्यांनी मोठ्या स्क्रीनवर संबंधित कागदपत्रे तसेच २०१३ आणि २०१८ मधील कार्यकारिणीच्या बैठकीची ध्वनिचित्रफीत दाखवली. यावरून विधानसभा अध्यक्ष नार्वेकर यांनी निर्णय देताना पक्षपातीपणा केल्याकडे ठाकरे यांनी ठपका ठोवला. ठाकरे गटाने या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. शिवाय शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे यांना बहाल करण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयालाही त्यांनी आव्हान दिले असल्याने सद्य:स्थितीत सर्वोच्च न्यायालयात ठाकरे गटाच्या दोन याचिका दाखल आहेत. यातील पहिला निकाल जरी ठाकरे गटाच्या बाजूने लागला तरी सर्वच प्रक्रिया संशयास्पद ठरणार आहेत.

## कोण आहेत मंगेश चिवटे ?

**मराठा आरक्षण आंदोलन यशस्वी करून दाखवणारा पडद्यामागचा खरा हिरो मंगेशराव हेच आहेत...**

**मुख्यमंत्र्यांचा हुकुमाचा जबरी एक्का, संवाददूत मंगेशराव,शब्दाला पक्का...**

भिमपँथर राजेश गवळी,
आंबेडकरी साहित्यिक मो.९०८२८०७६३९



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना.एकनाथराव शिंदे हे एक राजकारणी असून , त्यांच्या राजकारणाबद्दल अनेकांची अनेक मते असू शकतात. राजकारणी म्हणून कुणाला ते चांगले राजकारणी वाटू शकतात , तर कुणाला ते वाईट राजकारणी वाटू शकतात.प्रत्येकांची आपापली मते असतील.आणि तसे वाटण्यात काहीच गैर नाही. एकनाथरावांच्या राजकारणाबद्दल माझीसुद्धा काही मते आहेत , आणि कुणाचाही मुलाहिजा न बाळगता , अगदी बिनधास्तपणे ती मते मी नेहमीच परखडपणे मांडत आलेलो आहे. शत्रू असला तरी चांगल्याला चांगले म्हणत त्याचे जाहीर कौतुक करणे हा माझा स्थायीभाव आहे , आणि मित्र असला तरी त्याच्या दुर्गुणांवर जाहीरपणे आसूड ओढायला सुद्धा मी मागेपुढे पाहत नाही हे आपणा सर्वांना माहीतच आहे.त्यामुळे राजकारणी म्हणून एकनाथराव शिंदे कसेही असले तरी माणूस म्हणून हा व्यक्ती अतिशय दिलदार आहे , प्रामाणिक आहे हे आपण ठामपणे सांगू शकतो.( त्यांनी शिवसेनेत केलेले बंड हा त्यांच्या राजकारणाचा एक पक्षीय भाग आहे.) तसेच एकनाथराव शिंदे यांना माणसे पारखण्याची एक जबरदस्त हातोटी प्राप्त झाली असल्याने ह्या माणसाच्या अत्यंत विश्र्वसनीय वर्तुळात मंगेशराव चिवटे , राहुलजी लोंढे सारखी अनेक गुणी नररत्ने सामावलेली आहेत.

एकनाथराव शिंदे यांच्या नररत्नातील एक अत्यंत महत्वाचे रत्न असणाऱ्या मंगेशराव चिवटे यांनी आज पुन्हा एकदा अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. लक्ष वेधून घेण्याचे कारण आहे , अर्थातच मराठा आरक्षण. मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे पाटील ह्या धडपड्या तरुणाच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक महिन्यांपासून संवैधानिक मार्गाने आंदोलन सुरू होते.अलीकडच्या तीन / चार महिन्यात ह्या आंदोलनाने साऱ्या देशाचे लक्ष स्वतःकडे वेधून घेतले. मनोज जरांगे पाटलांच्या नेतृत्वाखाली लाखो मराठे एकवटू लागले.लाखालाखांच्या सभा होऊ लागल्या. पण सरकार त्यांच्या मागण्या मान्य करून घेण्यासाठी गंभीर नाही , अशी भावना ज्यावेळी जरांगे पाटलांची झाली , तेव्हा त्यांनी चलो मुंबई असा नारा देत शेवटचे अस्त्र बाहेर काढले आणि २० जानेवारी २०२४ पासून जालना ते मुंबई ह्या रस्त्यावर करोडो मराठा बांधव दिसू लागला. अगदी २२ जानेवारी रोजी होणारा राममंदिर सोहळा आमच्यासाठी महत्वाचा नसून आम्हाला फक्त आरक्षण हवंय, अशया प्रतिक्रिया देवभोळ्या मराठा समाजातून उमटू लागल्या.म्हणजे देव धर्मापेक्षा पोटातील भुकेचा धर्म मोठा असतो , पोटात पेटलेली आग मोठी असते, असेच जणूकाही मराठा बांधवांनी दाखवून दिलं.दिवसेंदिवस मराठा आंदोलन तीव्र होत होतं. परंतु मराठा समाज व महाराष्ट्र राज्य यांच्यातील संवाददूत बनून , दुवा बनून मंगेश चिवटे हे प्रथमपासूनच कार्यरत होते.मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी ही अत्यंत महत्वाची जबाबदारी आपले अत्यंत विश्र्वसनीय साथीदार असणाऱ्या मंगेशरावांवर सोपवली होती.मंगेशराव सुद्धा अतिशय प्रामाणिकपणे आपल्यावर सोपवलेली जबाबदारी चोख पार पाडत होते. आनंदाच्या क्षणी वा कठीण क्षणी त्यांनी कधीही आपला तोल ढासळू दिला नाही. नेहमीच डोक्यावर बर्फ ठेवून , जिभेवर साखर ठेवून मंगेशराव मराठे व राज्यसरकार मध्ये समेट घडवू पाहत होते. जे भल्याभल्यांना जमले नाही , रथी महारथी मंत्र्यांना जमले नाही , मातब्बर नेत्यांना जमले नाही , ते काम मंगेशरावांना जमेल काय ? असा अनेकांना प्रश्न पडला होता.पण एक व्यक्ती मात्र मंगेशरावांच्या कार्यक्षमतेवर प्रचंड विश्र्वास ठेवून होता , ती व्यक्ती अर्थातच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.एकनाथराव शिंदे हे होते. मी सोपवलेली कामगिरी आमचा मंगेश पार पाडणारच, असा दुर्दम्य विश्र्वास एकनाथरावांना होता आणि हा विश्र्वास मंगेशरावांनी सार्थ ठरवला. मंत्र्यासंत्र्यांना न जुमनणारे मनोज जरांगे पाटील मात्र मंगेश चिवटे यांच्या शिष्टाईला प्रतिसाद देत होते. तरीसुद्धा मराठे मुंबईच्या वेशीवर येऊन धडकले आणि पुन्हा एकदा आणीबाणीचा माहौल तयार झाला.परंतु मंगेशराव चिवटे यांनी शर्थीचे प्रयत्न करून आंदोलक आणि राज्यसरकार यांच्यातली कोंडी फोडली व एकनाथराव शिंदे यांनी मराठ्यांच्या सर्व मागण्या मान्य करीत असल्याचा सरकारी अध्यादेश ऋठ काढला.मंगेशराव चिवटे यांची मुत्सद्देगिरी कामा आली.

आता आपणा पैकी बऱ्याच जणांना प्रश्न पडला असेल की , कोण आहेत हे मंगेश चिवटे ? वास्तविक पाहता भारतीय स्वातंत्रसैनिकाच्या घरात जन्म घेतलेल्या मंगेशरावांचा मूळचा पिंड हा पत्रकारितेचा , ते आपल्या उमेदीच्या काळात पत्रकारिता करण्यासाठी सोलापूर सोडून मुंबईत आले. मंगेशरावांचे आजोबा स्वातंत्रसैनिक होते. चादरी करिता प्रसिध्द असलेल्या सोलापूर नगरीने अनेक नररत्न महाराष्ट्राला दिली.त्यातले मंगेशराव हे एक नररत्न आहे.पत्रकारिता करीत असतानाच त्यांना गोरगरीब रुग्णांचे निव्वळ पैश्या अभावी होणारे हाल पाहवत नव्हते.अत्यंत सह्रदय असणारे मंगेशराव हेलावून जायचे आणि ह्या रुग्णांसाठी आपण काहीतरी केलं पाहिजे असं हळव्या मनाच्या मंगेशरावांनी ठरवलं व त्यातूनच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष नावाची अभिनव संकल्पना आकाराला आली आणि साकारली.योगायोग असा आहे की , आज ह्याच कक्षाचे ते प्रमुख आहेत. मुख्यमंत्र्यांचे ते जडऊ आहेत , आणि आज त्यांनी मराठा आंदोलक व महाराष्ट्र राज्य सरकार मध्ये यशस्वीपणे संवाददूत म्हणून सुद्धा आपली भूमिका पार पाडली आहे.

जे का रंजले गांजले , त्यासी म्हणे जो आपुले , तोचि साधू ओळखावा , देव तेथेचि जाणावा, असे म्हणणारे राष्ट्रसूर्यसंत तुकाराम महाराज असो की , तीर्थी धोंडापाणी ,देव रोकडा सज्जनी ,असे रोखठोकपणे सांगत दीन दलितांची , शोषितांची , पीडितांची , अपंगांची , दीनदुबळ्यांची अविरत सेवा करणारे , स्वच्छ भारत अभियानाचे जनक असणारे महासंत गाडगेबाबा असो की आयुष्यभर रोगी , महारोग्यांची निरपेक्ष भावनेने सेवा करणाऱ्या नोबेल विजेत्या संत मदर तेरेसा असो , यातील कोणत्याही महापुरुषांना मी प्रत्यक्ष डोळ्याने पाहिले नाही , पण त्यांच्या अविरत जनसेवेमुळे ते प्रत्येकाच्या ह्रदयात वसलेले आहेत. त्याचप्रमाणे मंगेशजी नरसिंह चिवटे ह्या लाखो रुग्णांच्या देवाला सुद्धा आजवर अनेकांनी पाहिलं नाही , भेटले नाही ,पण ते मात्र आपल्याला त्यांच्या मानवतावादी रुग्ण कार्यातून नेहमीच भेटत असतात. त्यातूनच हा माणूस आपल्याला समजला , जनसेवेचा नि रुग्णसेवेचा वसा घेतलेला हा माणूस आरपार रुग्णसेवक आहे. रुग्णसेवेसाठी २४ तास उपलब्ध असणारा रुग्णदूत म्हणजे मंगेशजी चिवटे.

आज मंगेशजींनी जे कार्यकर्तुत्व गाजवले , जे मिशन यशस्वी करून दाखवले त्याला तोड नाही. त्यांना मी माझ्या गवळी परिवाराच्या वतीने आणि माझ्या संविधान रक्षक दल भीम आर्मीच्या वतीने मंगल मंगल सदिच्छा देत असून , अशीच तुमच्या हातून महाराष्ट्राची सेवा अखंडित घडो , याच मंगल कामना!!

पान १ वरुन

### ‘शपथपत्र देऊन जात बदलता..

कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब दिनांक २६ जानेवारी २०२४ नुसार मसूदा काढला आहे. यामुळे ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आपला हा निर्णय मूळ ओबीसीवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे दि.२६ जानेवारी २०२४ च्या राजपत्राचा मसूदा रद्द करण्यात यावा, असा पहिला ठराव मांडण्यात आला.

महाराष्ट्र सरकार नियुक्त न्या. संदीप शिंदे समिती ही असंविधानिक असून मागासवर्ग आयोग नसताना मराठा – कुणबी / कुणबी – मराठा जात नोंदींचा शोध घेऊन कोणत्याही मागासवर्ग आयोगाने (राज्य किंवा राष्ट्रीय आयोग) मराठा समाजाला मागास ठरविलेले नसताना समितीच्या शिफारशीवरून प्रशासनाकडून मराठा कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण केले जात आहे. सदर मराठा – कुणबी / कुणबी – मराठा प्रमाणपत्रांचे वितरणाला स्थगिती देण्यात यावी, असा तिसरा ठराव मांडण्यात आला. तसेच भारतीय संविधानातील तरतुदीनुसार मागासवर्ग आयोगाचे सदस्य आणि अध्यक्ष हे इंदिरा सहानी खटल्यातील निकालाप्रमाणे संबंधित जातीशी आसक्ती असलेले नसावेत असे अपेक्षित असताना मागासवर्ग आयोगाचे नवनियुक्त अध्यक्ष सुनील शुक्रे हे मराठा समाजाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यामुळे राज्य मागासवर्ग आयोग आणि न्या. शिंदे समिती रद्द करण्यात यावी, असा तिसरा ठराव मांडण्यात आला.

### नाट्य रंगभूमीला लोकाश्रय..

ही सांस्कृतिक चळवळ पुढे नेण्याचे काम नवी पिढी करणार आहे. शालेय विद्यार्थ्यांना नाट्य, संगीताचे शिक्षण दिले गेल्यास त्यांची सांस्कृतिक जाण अधिक प्रगल्भ होईल. विद्यापीठातून उत्तम नट, गायक तयार व्हावेत यासाठी विद्यापीठातील कला विभागाला शासनाने आर्थिक सहकार्य करावे. यासाठी विद्यापीठाला ५ कोटींचा निधी द्यावा. त्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नव कलावंत तयार होतील. अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मुंबई पुण्यात होणारी उत्तम व व्यावसायिक नाटके सोलापुरात होण्यासाठी नाट्य परिषदेने जिल्हास्तरीय समिती स्थापन करून उत्कृष्ट नाटक आणण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी यावेळी सांगितले. शासनाने नाट्य संमेलनासाठी ९ कोटी ३३ लाख रुपये दिले असून या निधीतून नाट्य परिषद विविध उपक्रम राबविणार आहे. १०० वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन पाच महिने सुरु राहणार असून या संमेलनाचा सांगता सोहळा रत्नागिरीत होणार आहे. याशिवाय या पाच महिन्यांच्या नाट्य संमेलनाच्या कालावधीत सर्व कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध कार्यक्रम आणि स्पर्धा घेण्यात येणार आहे. शासनाने ज्येष्ठ व गरजू कलावंतांना आरोग्य, घरकुल आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. नाट्य परिषद नाट्यकर्मीसाठी विविध योजना राबविणार असल्याचे यावेळी अखिल भारतीय नाट्य परिषदेचे कोषाध्यक्ष सतीश लोटके यांनी सांगितले.

यावेळी संमेलनाचे कार्यवाह विजय दादा साळुंखे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सोलापूर येथे १०० व्या अखिल भारतीय विभागीय मराठी नाट्य संमेलन पार पडण्यासाठी यशस्वीरित्या काम केल्याने पालकमंत्री श्री पाटील यांनी कौतुक करून स्वतःच्या हातातील घड्याळ विजयदादा साळुंके यांना भेट दिले. यावेळी श्री साळुंखे रंगमंचावरच भावूक झाले.

यावेळी शोभा बोल्ली यांच्या नटरंग या स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सोलापूर येथील सर्व रंगकर्मी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते नटराज पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतरचे नाट्यसंमेलन बीड येथे होणार असल्याने नटराजची मूर्ती आणि नाटकाची घंटा बीड शाखेकडे सुपूर्त करण्यात आली.

### ‘भारत जोडो न्याय यात्रे’

खरगे यांनी लिहिले आहे की, ‘‘मणिपूरमधून महाराष्ट्राकडे निघालेली ‘भारत जोडो न्याय यात्रा’ देशाला एकत्र आणण्यासाठी न्यायाचा संदेश घेऊन निघाली आहे. यापूर्वी काढण्यात आलेल्या कन्याकुमारी ते काश्मीर यात्रेदरम्यान कोणतेही विघ्न आले नव्हते. मात्र, यावेळेस काही समाजकंटक यात्रेला लक्ष्य करत आहेत. पश्र्चिम बंगालमध्येही असे घडू शकते, त्याचा हेतू राज्य प्रशासनाची प्रतिमा बिघडवणे किंवा यात्रेमध्ये व्यत्यय आणणे यापैकी नक्की कोणता असेल ते मी सांगू शकत नाही’’. ममता बॅनर्जी आणि गांधी कुटुंबीय यांच्यादरम्यानच्या स्नेहपूर्ण संबंधांचा त्यांनी उल्लेख केला आहे.

ही यात्रा पश्र्चिम बंगालमध्ये पोहोचण्यापूर्वीच काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसदरम्यान वाद वाढला आहे. आधी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी स्वबळावर निवडणूक लढवण्याची घोषणा केली. त्यानंतर जलपैगुडी येथे राहुल गांधी आणि यात्रेचे पोस्टर फाडण्यात आले असा आरोप काँग्रेसने केला आहे.

### नितीश कुमार नवव्यांदा

आपोआपच बरखास्त झाले. तद्नंतर भाजपाने नितीश कुमार यांना पाठिंबा दिला. हा पाठिंबा मिळताच नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा राज्यपालांकडे सत्तास्थापनेचा दावा केला.

नितीश कुमारांनी आज (२८ जानेवारी) नवव्यांदा बिहारच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. गेल्या १० वर्षांत त्यांनी पाच वेळा वेगवेगळ्या आघाडी आणि युतीसह सत्ता स्थापन केली होती. तर, २०२२ मध्ये त्यांनी एनडीएची साथ सोडून राजद–काँग्रेसच्या महागंठबंधन सरकारमध्येही ते मुख्यमंत्री बनले होते. तर, आता दोनच वर्षांत त्यांनी महागठबंधनची साथ सोडून पुन्हा एनडीएला जवळ केले आहे. म्हणजे दोन वर्षांत त्यांनी दोनदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली.

राजदबरोबर असलेल्या सत्तेतून राजीनामा देण्याची वेळ का आली? असा प्रश्न नितीश कुमारांना सकाळी विचारण्यात आला होता. त्यावर नितीश कुमार म्हणाले, राज्यकारभार योग्य रितीने चालत नव्हता, त्यामुळे माझ्यावर राजीनामा देण्याची वेळ आली. तुम्ही पत्रकारांनी मला यापूर्वी अनेकदा विचारल होतं. परंतु, तेव्हा मी बोलणं बंद केलं होतं. आम्ही सर्व परिस्थिती पाहत होतो. त्यानंतर मला लोक वेगवेगळे सल्ले देऊ लागले. मी माझ्या पक्षातील सहकाऱ्यांशी चर्चा केली. त्यांचे वेगवेगळे सल्ले घेतले. त्यानंतर आज राजीनामा दिला आहे आणि आमचं सरकार विसर्जित केलं आहे.

नितीश कुमार म्हणाले, आम्ही आधी भाजपाबरोबर युती केली होती. ती युती तोडून यांच्याबरोबर (राजद) आघाडी बनवली. परंतु, इथे येऊनही काही सुरळीत चालत नव्हतं. आमच्या लोकांना त्रास होत होता. ते मेहनत घेत होते. परंतु, काही गोष्टींचं त्यांना वाईट वाटत होतं. त्यामुळे मी या निर्णयापर्यंत पोहोचलो.

### हुरडा महोत्सवाचे आ.सचिन कल्याणशेट्टी

व्यापारी तत्व नाही. स्नेह बंधुभाव समाजकार्य वाढावा म्हणून हे हुरडा पार्टी होते.

यावर्षी मात्र प्रगतशील शेतकरी प्रमोद मालक पाटील व शिवराज अण्णा बिराजदार आयोजित हुरडा महोत्सव २०२४ चे गुरुवारी,२५ जानेवारी रोजी श्री म.नि.प्र अभिनव शिवलिंग महास्वामीजी विरक्त मठ मादन हिप्परगा व बसवलिंग महास्वामीजी, विरक्त मठ अक्कलकोट यांच्या दिव्य सानिध्यात तर भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष अक्कलकोटचे विद्यमान दमदार युवा आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते या हुरडा महोत्सवाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुंबईचे उद्योगपती किरण भैय्या हंचाटे हे होते.पुढे बोलताना आमदार सचिन कल्याणशेट्टी म्हणाले की,दरवर्षी अक्कलकोट येथील प्रसिद्ध व्यापारी व प्रगतशील शेतकरी प्रमोद पाटील व शिवराज बिराजदार यांच्या शेतात समाजातील सर्व स्तरातील लोकांनी महिनाभर हुरडा महोत्सवात सामिल होऊन गरमागरम हुरड्याचा आस्वाद घेत असतात.यामुळेच पाटील व बिराजदार परिवारांना एक प्रकारे समाधान मिळत असल्याचे आमदार कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

यावेळी श्री म.नि.प्र अभिनव शिवलिंग महास्वामीजी बोलताना म्हणाले की,आज समाजात पैसा ,संपत्तीने अनेक लोक श्रीमंत असतात,परंतु प्रमोद पाटील व शिवराज बिराजदार सारखे परोपकारी मनाने श्रीमंती लाभलेले माणस मात्र फारच कमी पहावयास मिळतात.कारण गेल्या १५ वर्षांपासून परोपकारी वृत्तीने हुरडा महोत्सव सुरू असून, यंदाच्या महिनाभर सर्व स्तरातील माणसांना प्रमोद पाटील व शिवराज बिराजदार यांनी हुरड्याचा आश्वाद देऊन माणूसकीचे दर्शन घडवून आणली.अशी घडविणारी माणस आज फारच दुर्मिळ पहायला मिळत असल्याचे सांगितले. यावेळी माजी नगरसेवक महेश हिंडोळे, निरगुडी कर्नाटकाचे पंचायत समितीचे माजी सभापती शंकरराव देशमुख,आळंदचे गुरुशरण पाटील , हुरडा महोत्सवाचे आयोजक प्रमोद पाटील व संयोजक शिवराज बिराजदार, विश्राम पटेल, दत्तराज गुत्तेदार, बोरामणीचे अनिता माळगे, कुंभारीचे रामचंद्र होनराव,काशिनाथ बिराजदार तालुका कृषी अधिकारी लातूर, सुनील पाटील मुंबई, आशिफ शेख आळंद, धनंजय गाढवे, पीएसआय जाधव,कन्नड साहित्य परिषदेचे अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी,रेवणप्पा बोरगाव, अशोक बिराजदार, चंदू बिराजदार, फकिरप्पा बोरगाव, शिवपुत्र हळगोदे, विद्याधर गुरव, किरण नरेगल आदीजण हुरडा महोत्सवच्या पहिल्या दिवशी प्रारंभ वेळी उपस्थित होते. दररोज ३०० ते ५०० लोक या हुरड्याचा आस्वाद घेतात.ज्वारीचे बियाणे (कचकची) शेतकऱ्यांना मोफत देण्यात येतात. मोफत तिसऱ्या श्र्वावणी सोमवारी गुळवेल , हुरडा बेलपत्रे मल्लिकार्जुन मंदिर येथे वाटप केले जाते. प्रमोद पाटील हे व्यापारी असुन स्वतः पदवीधर आहेत.शिवराज बिराजदार कुंटुंबीय मदत करतात. व मुंबईचे युवा उद्योजक किरण भैया हंचाटे, विश्राम पटेल,सोमशेखर जमशेट्टी,नंदू हंचाटे, विद्याधर गुरव, रेवणप्पा बोरगाव या सर्वांचा विशेष सहकार्य लाभत आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विद्याधर गुरव यांनी केले.

## पंढरपूरच्या श्रीकांत शिंदे यांच्यावर राष्ट्रवादी युवकची मोठी जबाबदारी



पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून कार्यकर्ता ते प्रदेश सरचिटणीस अशी उंच भरारी घेणारे पंढरपूरचे श्रीकांत शिंदे यांनी राष्ट्रवादीत झालेल्या राजकीय बंडानंतर विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जोरदारपणे समर्थन केले. त्यामुळे अजितदादांनी देखील श्रीकांत शिंदे यांच्यावर आधी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीसपदाची जबाबदारी दिली. आता त्यात आणखी भर पडली असून आगामी निवडणूकीच्या दृष्टीने अजित पवार यांनी महाराष्ट्रातील काही महत्वाच्या पदाधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविलेल्या आहेत त्यामध्ये पंढरपूरच्या श्रीकांत शिंदे यांच्यावर मराठवाड्यातील धाराशिव लोकसभा मतदारसंघाच्या राष्ट्रवादी युवक काँग्रेस निरीक्षकपदाची जबाबदारी देवून त्यांच्यावर आणखी विश्र्वास दाखविलेला आहे. त्यामुळे श्रीकांत शिंदे हे धाराशिव जिल्ह्यातील राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून युवकांची फळी मजबूत करून आगामी निवडणूकीत त्यातून राष्ट्रवादीचे जास्तीत जास्त उमेदवार विजयी करण्यासाठी मोलाची भर टाकणार असून राष्ट्रवादीचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आणखी जोमाने काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

श्रीकांत शिंदे यांनी अगदी सर्वसामान्य कार्यकर्ता ते राष्ट्रवादीच्या वरिष्ठांमध्ये आपल्या कामाच्या व कार्याच्या जोरावर वेगळा ठसा उमटविलेला आहे. पंढरपूरातील घरकुल योजना असो, रस्त्यावरील खड्डे असो, शिक्षण खात्यातील गैरकारभारावर आवाज उठविणे असो, क्रीडा समस्यांवर आवाज उठविणे, नगरपरिषदेच्या प्रश्नांवर आवाज उठविणे यासह अनेक महत्वाचे प्रश्न त्यांनी आवाज उठवून सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम केलेले आहे. त्यामुळेच वरिष्ठांनी आता धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे निरीक्षक म्हणून नवीन जबाबदारी सोपवलेली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# मंगळवेढा शहरामध्ये साकार होणारा टाऊन हॉल म्हणजे वैभवशाली संतनगरीचे प्रतीक: आ समाधान आवताडे

मंगळवेढा/प्रतिनिधीः अनेक संतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या मंगळवेढा संतनगरीमध्ये साकार होणारा टाऊन हॉल म्हणजे मंगळा संतनगरीचे वैभवशाली प्रतीक असल्याचे प्रतिपादन पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहे. मंगळवेढा तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते संपन्न झाले आहे. त्याचबरोबर मंगळवेढा शहरात साकार होत असलेल्या टाऊन हॉलचे आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले आहे. त्याप्रसंगी आमदार आवताडे हे बोलत होते.

आमदार समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांतून निधी मंजूर झालेल्या मंगळवेढा शहरातील मुरलीधर चौक ते शनिवार पेठ नगरपालिका हद्दीपर्यंत रस्ता व जुनी बँक ऑफ इंडिया बँकेच्या इमारती पासून मुद्गुल ऑफिस पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे १ कोटी, मंगळवेढा नगरपरिषद अंतर्गत मंगळवेढा नगरपरिषद सुधारित विकास योजना आराखड्यातील आरक्षण क्रमांक १७ मधील बहुउपयोगी हॉल बांधकाम करणे ७ कोटी २४ लाख, नागणेवाडी येथे सात लाख लीटर क्षमतेची आर सी सी उंच टाकी बांधणे भूमिपूजन ६५ लाख, साठे नगर येथील सिटी सर्व्हे क्रमांक २७१ मधील आरक्षण क्रमांक ५६ मधील जागेस संरक्षण भिंत बांधणे व सुशोभीकरण करणे ७४ लाख, मंगळवेढा शहर व तालुक्यातील दिव्यांग बांधवांसाठी मंगळवेढा शहरातील सिटी सर्व्हे २७१ या जागेमध्ये साकार होणाऱ्या दिव्यांग भवन ३७ लाख इत्यादी विकास कामांचे त्यांनी भूमिपूजन व लोकार्पण केले आहे.

मंगळवेढा शहरामध्ये साकार होत असलेल्या बहुपयोगी हॉलमुळे विविध राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांसाठी चांगले व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. नियोजित या हॉलसाठी तालुक्याचा एक लोकप्रतिनिधी म्हणून मी माझी जबाबदारी नेटाने पूर्ण करून तालुक्याच्या वैभवासाठी नक्की प्रयत्न करणार आहे. संतांची भूमी असा लौकिक असणाऱ्या मंगळवेढा भूमीमध्ये उभारणाऱ्या या हॉलमुळे शहराची भौतिक समृद्धता आणखी व्यापक आणि उंचावणारी ठरणार आहे. या हॉल उभारणीमध्ये निधीच्या रूपाने जास्तीत-जास्त योगदान देणार असल्याचेही आमदार आवताडे यांनी यावेळी आवर्जून सांगितले.




गेल्या दोन वर्षाच्या आमदारकी टर्ममध्ये आतापर्यंत मतदार संघातील विविध विकास बाबींसाठी जनसेवेला केंद्रस्थानी ठेवून आपण १७०० ते १८०० कोटी रुपयांचा निधी खेचून आणला आहे. यापुढील काळामध्येसुद्धा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण भरघोस निधी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने शासन दरबारी प्रयत्नशील राहून जास्तीत जास्त निधी मतदार संघाच्या पदरी पाडून घेणार असून आपण स्थानिक पातळीवरील कोणत्याही प्रकारचे राजकारण डोक्यामध्ये न ठेवता आपल्या गावाच्या व शहराच्या विकासासाठी माझ्याकडे पाठपुरावा करा मी तुम्हाला भरून निधी देण्यासाठी बांधील असेल असेही आमदार आवताडे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

दिव्यांग भवन भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी आ आवताडे म्हणाले की, कमी बोलणे आणि जास्त काम करणे ही माझी सवय आहे. केवळ बोलाचीच कडी अन बोलाचाच भात न करता गेली दोन वर्षे आपण विकास कामांच्या माध्यमातून मतदारसंघाच्या उज्वल निर्मितीसाठी प्रयत्नशील आहे. दरम्यानच्या काळामध्ये गुणात्मक आणि दर्जात्मक कामासाठी आपण आग्रही होतो. अशी विकासकामे करत असताना कोणत्याही प्रकारचा अर्थिक लोभ अथवा टक्केवारी पद्धत मोडीत काढून केवळ उत्कृष्ट कामासाठी प्राधान्य दिले आहे. कोणत्याही ठेकेदादाराने टक्केवारीसाठी मी पैसे मागितले असे सांगितले तर मी राजकारण सोडून देतो असा परखड विश्र्वास आ आवताडे यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना माजी पालकमंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे यांनी सांगितले की, आ. समाधान आवताडे यांच्या माध्यमातून मतदारसंघामध्ये विकासाचा अमृतकलश येत असताना द्वेष भावनेने काही अपशकुनी लोक या विकास कामांमध्ये खोडा घालण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत परंतु जनतेच्या विकासाशी बांधील असणारे लोकप्रतिनिधी आ आवताडे यांची ओळख असल्यामुळे त्यांचा हा प्रयत्न कधीही सफल होणार नसल्याचेही प्रा.ढोबळे यांनी ठासून सांगितले आहे.

प्रदेश कॉंग्रेस अल्पसंख्यांक सरचिटणीस फिरोज मुलाणी हे यावेळी बोलताना म्हणाले की, आपल्या तालुक्यातील बौद्धिकदृष्ट्या कमकुवत व विघ्नसंतोषी असणाऱ्या मंडळींनी संपुष्टात आलेले आपले राजकीय आस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी नुसती उठाठेव चालू केली असताना आ आवताडे यांनी सर्वसमावेशक समाजकारण आणि सलोख्याचे राजकारण ही कार्यनीती वापरून कोणत्याही प्रकारे पक्षीय अथवा जातीय राजकारण न करता सामान्य जनतेच्या विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवल्याने त्यांच्या माध्यमातून संपूर्ण मतदारसंघाचा चेहरा-मोहरा बदलत आहे. यापुढील काळामध्येही आ आवताडे यांनी अडगळीला पडलेल्या अशा लोकांना फारसे महत्व न देता विकासाचा रथ असाच गतिमान करावा असेही मुलाणी यांनी सांगितले आहे. या कार्यक्रमांसाठी माजी पालकमंत्री प्रा.लक्ष्मणराव ढोबळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती सोमनाथ आवताडे, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य प्रदीप खांडेकर, भाजपा जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण, जिल्हा लेबर फेडरेशन संचालक सरोजभाई काझी, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत पडवळे, प्रांताधिकारी गजानन गुरव, बी.आर माळी, तहसीलदार मदन जाधव, नगरपरिषद मुख्याधिकारी चरण कोल्हे, पोलीस निरीक्षक रणजीत माने, माजी उपसभापती रमेश भांजे, संचालक तानाजी काकडे, शिवयोगी पुजारी, अशोक केदार, माजी संचालक राजीव बाबर, सचिन शिवशरण, माजी समाजकल्याण सभापती शीलाताई शिवशरण, यशोदा पतसंस्था चेअरमन नीलाताई आटकळे, माजी उपसभापती धनंजय पाटील, जगन्नाथ रेवे, उद्योजक जनार्दन शिवशरण, माजी नगरसेवक महादेव जाधव, भारत नागणे, कैलास कोळी, युवराज शिंदे, प्रमोदकुमार म्हमाणे, सुजित कदम, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष युवराज कोळी, प्रताप सावंजी, माजी मि.नगराध्यक्ष सोमनाथ माळी, सचिन शिंदे, फिरोज मुलाणी, चंद्रशेखर कोंडुभैरी, प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष समाधान हेंबाडे, खंडू खंदारे, जनार्दन डोरले, बापूसाहेब मेटकरी, डी. सी. जाधव, दिगंबर यादव, नगरपरिषदेचे विनायक साळुंखे, विलास आवताडे, संजय माळी, आदित्य मुदगुल, आनंद मुढे, सरपंच शिवाजी सरगर, जमीर इनामदार, लहु ढगे, संतोष रंदवे आदी तसेच तालुक्याच्या सामाजिक, राजकीय व शैक्षणिक कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर, प्रशासकीय अधिकारी, पदाधिकारी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आमचे आमदार समाधान आवताडे यांनी आमदार झाल्यापासून मंगळवेढा तालुक्यातील अपंगांच्या व्यथा अतिशय संवेदनशील पणाने समजून घेत महाराष्ट्र राज्यातील पहिले दिव्यांग भवनाचे भूमिपूजन करून या लढ्याला मोठे यश मिळवून दिले आहे. तालुक्यातील अपंगांच्या सोयीसाठी तालुक्यामध्ये भव्यदिव्य दिव्यांग भवन असावे अशी अनेक दिवसांपासून दिव्यांगांची इच्छा होती ती आता आमदार समाधान आवताडे यांच्या माध्यमातून व प्रयत्नातून साकार होत आहे. आमदार आवताडे यांच्या माध्यमातून उभारण्यात येत असलेल्या या अपंग भवनामुळे तालुक्यातील अपंग बंधू-भगिनींमध्ये अतिशय आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे- समाधान हेंबाडे ( तालुकाध्यक्ष, प्रहार संघटना)**

# सैनिक टाकळी मध्ये मराठा आरक्षण मिळाल्याबद्दल साखर पेढे वाटून मोठा जल्लोष




सैनिक टाकळी /प्रतिनिधीः शिरोळ येथे मराठा आरक्षण मिळाल्याबद्दल मोठा जल्लोष करण्यात आला. भारतीय मराठा महासंघाचे तालुका अध्यक्ष अमर वसंतराव पाटील हे मुंबईला मनोज जरांगे पाटील आंतरवली पासून मुंबईला पायी चालत आंदोलनामध्ये अमर पाटील कोरेगाव पासून सामील होते. मराठा आरक्षणाचा गुलाल घेऊन सैनिक टाकळी आज परत आलेवर सैनिक टाकळी मधील युवकांनी त्यांचे मोठ्या उत्साहात स्वागत केले. सैनिक टाकळी मध्ये पेढे साखर वाटप करून मराठा आरक्षण मिळाल्याबद्दल आनंद साजरा केला. प्रथमतः हा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून वंदन करण्यात आले .मनोज जरांगे पाटील यांचे आभार मानण्यात आले. नंतर गावांतून मोटर सायकल रॅली काढण्यात आली. एक मराठा लाख मराठा अशा घोषणांनी सैनिक टाकळी दुमदुमून गेली. यावेळी सैनिक टाकळी चे अमर पाटील. माजी सैनिक बबन पाटील. संतोष गायकवाड. श्रीधर भोसले. विनोद पाटील.संभाजी गोते. महादेव पाटील. शशिकांत कदम. पत्रकार विनोद पाटील. महेश पाटील. प्रकाश देसाई. आनंदराव चव्हाण. व गावातील सर्व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ईटकुर ग्रामपंचायतला प्रजासत्ताक दिनी संविधान निर्मात्याचा पडला विसर

## हम करे सो कायदा करणाऱ्या विरोधात तहसील कार्यालय, पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन कळंब, उपविभागीय अधिकारी कळंब यांना निवेदन




ईटकुर/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील ईटकुर येथे २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणात संविधान निर्माते विश्र्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचा विसर पडला असून वारंवार ग्रामस्थांकडून सरपंच, प्रशासकीय कर्मचारी, ग्रामविकास अधिकारी, व कर्मचारी यांना सूचना देऊनही काही फरक पडेना त्यामुळे कर्तव्यात कसूर करून हेतू परस्पर जाणीवपूर्वक महापुरुषांची अवहेलना करणाऱ्या व कायदा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या संबंधित ग्रामविकास अधिकारी,व ग्रामपंचायत कर्मचारी यांच्याविरुद्ध १०६ ग्रामस्थांचे गट विकास अधिकारी यांना कारवाईसाठी निवेदन देण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की प्रशासन स्तरावरील साजरे होणारे राष्ट्रीय सण उत्सव ज्या त्यावेळी कार्यक्रमाचे महत्त्व समजून घेऊन कार्यक्रम साजरे करणे संदर्भात ग्रामपंचायतचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी, कर्मचारी, यांना वारंवार ग्रामस्थांनी चर्चा करूनही त्यांच्यामध्ये काहीच बदल दिसून आला नाही. २६ जानेवारी २०२४ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिन भारताला संविधान देणाऱ्या भारतरत्न, महामानव, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पुजेसाठी फोटो अथवा त्यांची प्रतिमा असणे आवश्यक असताना ग्रामपंचायतीचे कर्मचारी, ग्रामविकास अधिकारी, यांच्या मनमानी कारभारामुळे व जातीय द्वेष भावनेतून या गावी डॉ. बाबासाहेबांची संविधान घेतानाची प्रतिमा न लावताच प्रजासत्ताक दिन साजरा केला गेला. त्यामुळे येथील ग्रामस्थांनी त्यांच्या विरोधात संबंधित वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे लेखी निवेदन देऊन व योग्य न्याय मिळावा यासाठी ग्रामस्थ आक्रमक झालेले दिसून आले. संबंधित कर्मचारी व अधिकारी सरपंच यांच्या विरोधात कळंब तहसीलदार,पोलीस उपविभागीय अधिकारी, पोलीस निरीक्षक कळंब, यांना निवेदन देऊन संबंधित कर्तव्यात कसूर करणाऱ्या कर्मचारी, अधिकारी,यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे लेखी निवेदन १०६ ग्रामस्थांच्या सहिनिशी देण्यात आले. यावर प्रतिनिधीक स्वरूपात हे निवेदनावर दै. देशभक्त संपादक लक्ष्मण शिंदे, व्हॉइस ऑफ मीडिया डिजिटल विभाग कळंब तालुका अध्यक्ष-अमोल रणदिवे, दै.यश सिद्धी न्यूज चे पत्रकार सुधाकर रणदिवे, सामाजिक कार्यकर्ते रितेश लागाडे, निलेश शिंदे, भाई बजरंग ताटे, यांच्या स्वाक्षरी आहेत.

# केबीपी कॉलेजमध्ये एनसीसीचे दिमाखदार परेड संचलन

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतातील लोकशाही ही जागतिक स्तरावरील एक आदर्श लोकशाही असून देशाने स्वातंत्र्योत्तर काळात मोठ्या प्रमाणात प्रगती साधली आहे. देशातील विविधता सांभाळून देखील ऐक्य टिकवण्यामध्ये देश यशस्वी ठरला आहे. भारतीय संविधान हे आदर्शवत आहे. सर्वांना समान न्याय, समता, बंधुता आणि स्वातंत्र्य बहाल करते. शैक्षणिक क्षेत्रात देशाने केलेली प्रगती ही वाखाणण्याजोगी आहे. शिक्षण, आरोग्य, वाहतूक आणि दळण वळण यात देशाने केलेली प्रगती ही वैशिष्ट्यपूर्ण आहे.असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ चंद्रकांत खिलारे यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात पंच्याहत्तराव्या प्रजासत्ताक दिन कार्यक्रमांमध्ये ते मनोगत व्यक्त करत होते. या कार्यक्रमात 'एनसीसी'च्या छात्र सैनिकांनी पंच्याहत्तराव्या प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रध्वजास गार्ड सलामी दिली. त्याचबरोबर एनसीसी विभागामार्फत महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये दिमाखदार परेड संचलन करण्यात आले. यामध्ये एनसीसीचे चार प्लाटून सहभागी झाले होते. महाविद्यालयातील एनसीसी विभागामध्ये एकूण एकशे सात छात्र सैनिक दरवर्षी प्रशिक्षण घेत असतात यामध्ये एकूण चौपन्न मुले आणि त्रेपन्न मुली यांचा सहभाग असतो. प्रजासत्ताक दिन परेड संचलन यशस्वी करण्यासाठी पंधरा दिवसापासून महाविद्यालयातील एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट डॉ. समाधान माने यांच्या मार्गदर्शनाखाली कॅडेट्स सराव करीत होते. या संचलनामध्ये एनसीसीच्या छात्र सैनिकांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. जूनियर अंडर ऑफिसर गणेश साळुंखे याने परेड कमांडर म्हणून जबाबदारी पार पाडली. त्याचबरोबर सीनियर अंडर ऑफिसर तुकाराम गाजरे, सीनियर अंडर ऑफिसर वैष्णवी चव्हाण, जुनिअर अंडर ऑफिसर महेश आसबे, ज्युनिअर अंडर ऑफिसर अक्षदा कदम आणि जुनिअर अंडर ऑफिसर मनीषा गुंड या सर्व कॅडेट्सनी वेगवेगळ्या प्लॅटूनचे नेतृत्व केले. कॅडेट समाधान जगताप याने गार्ड कमांडर म्हणून जबाबदारी पार पाडली.

एनसीसी विभागातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकामध्ये दिवसेंदिवस भर पडत आहे. महाविद्यालयातील एनसीसी विभागातील कॅडेट दरवर्षी भारतीय सैन्यामध्ये भरती होत असतात. त्याचबरोबर विविध राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील कॅम्पसमध्ये महाविद्यालयातील एनसीसी छात्र आपला सहभाग नोंदवत असतात.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट डॉ. समाधान माने, आय. क्यू.ए.सी.चे समन्वयक डॉ.अमर कांबळे, स्वायत्त महाविद्यालय समन्वयक डॉ. मधुकर जडल, रुसा समन्वयक प्रा. योगेश पाठक, रुसा सहसमन्वयक डॉ चंद्रकांत काळे, उपप्राचार्य डॉ भगवान नाईकनवरे, डॉ बजरंग शितोळे, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ बाळासाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ अनिल चोपडे, कार्यालयीन अधीक्षक प्रभाकर पारधी, त्याचबरोबर महाविद्यालयातील सीनिअर, ज्युनिअर व व्होकेशनल विभागातील शिक्षक, शिक्षकेतर व कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी व सेवानिवृत्त सेवक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी एनसीसी चे माजी विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

# पारंपारिक लोककलांनी निघाली नाट्य दिंडी

## नाट्य दिंडीत नाट्य कलावंतांसह पालकमंत्री यांचा समावेश

सोलापूर/प्रतिनिधीः पारंपारिक लोककलांनी व ढोल, ताशा, लेझीम, भगवे - लाल फेटे, रांगोळ्यांच्या पायघड्या आणि नाट्य कलाकारांच्या उपस्थित १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाची नाट्य दिंडी आज बलिदान चौक ते नॉर्थ कोट मैदान पर्यंत निघाली.

यावेळी नाट्य दिंडीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील,अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले, सिने अभिनेता तथा विश्र्वस्त मोहन जोशी,

प्रा. शिवाजी सावंत, कार्याध्यक्ष प्रकाश यलगुलवार, सहकार्याध्यक्ष राजा माने, प्रमुख कार्यवाह विजयकुमार साळुंके तसेच विविध मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार सहभागी झाले होते. नाट्य दिंडीत नाट्य कलावंतासोबत तसेच पारंपारीक लोक कला असलेल्या वासुदेव, पोतराज, गोंधळी, बहुरूपी तसेच मानाचे नंदीध्वज, वारकरी, बहुरंगी वेशभूषेतील लोककलाकारांच्या लोककलेने ही नाट्य दिंडी सजली होती. ही नाट्य दिंडी पाहण्यासाठी सोलापूरकरांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती



# सर्व समाजाला एकत्र ठेवण्याचं काम फक्त संविधानच करू शकत : सागर सोनकांबळे



पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रजासत्ताक दिनानिमित्त संविधान रॅली चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी नेते सागर सोनकांबळे यांनी म्हणाले की संविधानाने आपल्याला सर्व हक्क अधिकार दिले. भारतीय संविधानाने आपल्याला समता,बंधुभाव,न्याय ही मूल्ये दिली. ही जपणं आपले कर्तव्य आहे. ही संविधानाची मूल्ये शेवटच्या व्यक्तीपर्यंत समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचवयाची जबाबदारी तरुणांची आहे, असे प्रतिपादन केले.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी एकत्र येवून प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी सायंकाळी तिरंगा पदयात्रेचे आयोजन केले होते. मुख्य इमारतीसमोरील सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करून ही तिरंगा पदयात्रा सुरू झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू या महामानवांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामूहिकरित्या संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी प्रमूख पाहुणे म्हणून कॉंग्रेस प्रदेश प्रवक्ते हनुमंत पवार,इंटकचे अध्यक्ष बळीराम डोळे, कॉंगेस चे अक्षय कांबळे. आम्रपाली धिवार, डापसा विद्यार्थी संघटनेचे सागर सोनकांबळे, त्रंबक हिप्परकर उपस्थित होते. पदयात्रेचे आयोजन विशाल कांबळे, माधुरी सोनवणे, रविराज कांबळे, शकील शेख, सिद्धांत जांभुळकर, हुजेफा शेख, बापूराव घुंगुरगावकर यांनी केलें होते. यावेळी सोमनाथ अंबोरे, रामदार वाघमारे, श्रीपाद एकेले, रोहित बनसोडे, मनोज सोनकांबळे, अविनाश कांबळे, सागर धुमाळ, समाधान दुपारगुडे व आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# जुळे सोलापूर येथे नाट्यगृह उभारणीसाठी दहा कोटीचा निधी देणार : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर ही कलावंतांची भूमी आहे. येथील कलावंतांना प्रोत्साहन मिळण्यासाठी जुळे सोलापूर येथे नाट्यगृहाची उभारणी करण्यात येणार असून महापालिका जागा उपलब्ध करून देत आहे. तर नाट्यगृहाच्या बांधकामासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून १० कोटीचा निधी मंजूर केलेला असून यापेक्षा अधिक निधीची गरज भासल्यास सांस्कृतिक कार्य विभागाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येईल अशी ग्वाही उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्यमंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.



शतक महोत्सवी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या मुख्य रंगमंचाचे पूजन व उद्घाटन(दि. २६) पालकंमत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते दीपप्रजव्लन करुन करण्यात आले. यावेळी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, संमेलन कार्यवाह विजयदादा साळुंके, प्राचार्य शिवाजीराव सावंत, संमेलन कार्याध्यक्ष प्रकाश युलगुलवार, समन्वयक कृष्णा हिरेमठ, रणजित गायकवाड, पी. पी. रोंगेसर, सहकार्यवाह विश्र्वनाथ आवड, तेजस्विनी कदम, नरेंद्र काटीकर, दत्ताअण्णा सुरवसे, मोहन डांगरे, भारत जाधव, नाट्यरसिक, कलांवत आदि उपस्थित होते. पालकमंत्री श्री. पाटील म्हणाले, जुळे सोलापूर येथे नाट्यगृह उभारणीसाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना महापालिकेला केल्या आहेत. महापालिकेच्या वतीने नाट्य घरासाठी जागा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही अत्यंत तातडीने होत आहे. हे नाट्यगृह लवकर व्हावे यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध असल्याचे ही स्पष्ट केले.

शतक महोत्सवी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन सोलापूर येथे होत असल्याबद्दल आनंद आहे. संमेलन यशस्वी होण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आव्हान त्यांनी केले. यावेळी प्रकाश युलगुलवार व प्राचार्य शिवाजीराव सांवत यांनी मनोगत व्यक्त केले.ाटच संमेलनाचे प्रास्ताविक विजयदादा साळुंके यांनी केले. नाट्य संमेलनातील कार्यक्रमाची रूपरेषा त्यांनी सांगितली. हे नाट्य संमेलन सोलापूर येथील कलावंतासाठी त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा यासाठी एक प्रकारचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. तरी कलावंतांनी त्याचा लाभ घ्यावा असेही त्यांनी आवाहन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा गव्हाणे व अमृत ढगे यांनी केले तर आभार तेजस्विनी कदम यांनी मानले.

# ७५ गणतंत्र दिवस हर्षऊल्लसात साजरा

मुंबई : बहादुर माजी सैनिक बहुउद्देशीय संघटना अमरावती तथा यश सिद्धी आजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक अमरावती येथे ७५ व गणतंत्र दिवसाच्या निमित्त संविधान प्रस्ताविकेच्या वाचन व बाबासाहेब यांना मानवंदना देऊन कार्यक्रमाची सुरुवात केली कार्यक्रमांमध्ये माजी सैनिक तसेच सेवारत सैनिक त्यांचे परिवार व इतर नागरिक मिळून आजचा कार्यक्रम भव्यदिव्य मानवंदनेसह सुरुवात झाली. बाबासाहेबांना माजी सैनिकांनी मानवंदना देऊन संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन केले, राष्ट्रगान सोबत मान्यवरांनी संविधानाबाबत आजच्या गणतंत्र दिवसा बाबत आपले विचार व्यक्त केले. सर्वांनी संविधानाबाबत मनोगत व्यक्त करताना विशेष डॉक्टर बाबासाहेबांची जाणीव करून दिली आणि आपल्या स्वातंत्र्याबद्दल वेगवेगळ्या आर्टिकलची माहिती करून दिली. विशेषता आर्टिकल १४ आर्टिकल १९ आर्टिकल २१ याबाबत विशेष संबोधन करण्यात आले . उपस्थिताना संविधानाचे महत्त्व पटवून देण्यात आले, संविधानाची जाण करून देण्यात आली आणि संविधानाला रोजच्या जीवनामध्ये अंतर्भूत करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. बहादुर माजी सैनिक बहुउद्देशीय संघटना अमरावती कार्यालयात आजच्या या कार्यक्रमाला उपस्थित माननीय



डॉक्टर लेडी गव्हर्नर कमलताई गवई विशेष उपस्थित होते. माननीय लेडी गव्हर्नर कमलताई गवई यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. बहादूर माजी सैनिक बहुउद्देशीय संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माननीय बीएस रायसाहेब उपस्थित होते. त्यानंतर सर्वांचे फोटो सेशन झाले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले यामध्ये कॅप्टन अलीम पटेल साहेब, माजी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अँड. राजेंद्रकुमार खोब्रागडे, सुनील बोबडे, सेवानिवृत्त ट्रेझरी ऑफिसर, मा नंदकुमार काळे,नायब तहसीलदार, गजानन इंगळे यांनी आजच्या कार्यक्रमाचे सूत्र संचालन केलें व सुभेदार प्रदीप गायकवाड यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला आवर्जून उपस्थिती डी.बी चेव्हान, अशोक बुन्धे, नरेन्द्र वानखडे, भिमराव गायकवाड, धर्मराज बोरकर, गजानन मेश्राम, सुभेता ओघुल रोडे, मधुकर वानखडे, अँड राजेन्द्रकुमार खोब्रागडे, अशोक रोडके, राजेश मेल, भालचंद्र देशमुख, शुभाष पाटील, सुभेदार प्रदिप गायकवाड, पोडुरंग सुर्वे, वसेल पाटील, गजानन सेरेकर, गजानन इंगळे, सतिश नाईक, रवी गवई (सु गायक), निलेश येले. बिजवाल सोहेब (उपजिल्हाधिकारी तथा सैनीक कल्याण अधिकारी, प्रशांत भड, संजय शिंदे (कॅप्टन), पीडी इंगळे, आकाश रायबोले, ए जी मालोकर, एन खोराडे, नंदकिशोर सेगोकार, श्रीमती माया बोरकर, सौ. पंचशिला खोब्रागडे, सौ.ममला सरदार, सौ. गौरीताई देशमुख, सौ. प्रीया गायकवाड (अध्यक्ष) सो निळू राय (उपाध्यक्ष), सौ.रजनी इंगळे. सौ सुजाता सु. खांडेकर सौ. माधुरी रोगोकार, सील्पा येते, सौ.सुनंदा ढोके, सौ.फिलीलाई देशमुख, सौ. शिवल नाईक सौ वैशाली तायेडे, सौ. प्रतिकक्षा खोडेकर, चंदा देवीदास लायो, सी री. गवई या बहादूर महिला बचत गटाच्या महिला आवर्जुन उपस्थित होते.

# एस जी परमशेट्टी प्रशालेचा नेपाळ सहल यशस्वी

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री एस जी परमशेट्टी हायस्कूलची सहल यंदा शैक्षणिक सहल नेपाळला गेला असून १६ जानेवारी ते २५ जानेवारी पर्यंत चा दहा दिवसाचा सहल रीतसर शिक्षणाधिऱ्याची परवानगी घेवून यशस्वीरित्या पूर्ण करून आले दुधनी ते सोलापूर सोलापूर ते कल्याण कल्याण ते गोरखपुर गोरखपुर ते पोखरा पोखरा ते काठमांडू काठमांडू ते मनकामना देवी ते लुंबिनी सोनोली बॉर्डर पार करून परत दुधनी कडे यशस्वीरित्या पोहोच झाले सर्वप्रथम पोखरा या शहरातील विंध्यवासिनी मंदिर गुप्तेश्र्वर महादेव मंदिर माऊंट एव्हरेस्ट हिमालय पर्वत रांगा जवळून पहाण्याचा भाग्य आम्हाला लाभला सारंग कोट सनसेट फेवा लेक मधील बोटिंग पाहण्यात आले काठमांडू येथे गोल्डन बुद्ध मंदिर गुहेश्र्वरी शक्तीपीठ स्वयंभू नाथ मंदिर पशुपतिनाथ मंदिर बुडा नीलकंठ मंदिर असे सुंदर स्थळांना भेटी दिल्या मनोकामना येथे मनकामना देवीचे दर्शन साडेतीन किलोमीटर उंच वर जाऊन दर्शन घेतले या रोप वे तून सुंदर अशा प्रकारचा




हिमालय पर्वत रांगा जवळून दिसत होत्या शेवटी लुंबिनी येथे येऊन गौतम बुद्ध यांचा जन्मस्थान ज्या ठिकाणी झालं त्या ठिकाणी जाऊन शांती ज्योत लावून व विविध देशातील बुद्ध मंदिरांचा देखील दर्शन त्या ठिकाणी झालं अशा प्रकारे नेपाळ सहलीचा सुबद्ध नियोजन सहल प्रमुख दत्तात्रय हिळळी यांनी केले होते उत्तम नियोजनामुळे ही सहल यशस्वी झाल्याचं मत मुख्याध्यापक रेवणसिद्ध अलीगावे यांनी व्यक्त केले पहिल्यांदाच परदेशी दौरा केल्यामुळे व सहल यशस्वी झाल्यामुळे सहल प्रमुख दत्तात्रय हिळळी व उपप्रमुख राजशेखर पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आले सहल यशस्वी करण्यासाठी सुरेश बिराजदार नागराज कलबुर्गी परमेश्र्वर कोळी महानिंग सोमेश्र्वर मलया स्वामी चंद्रशेखर खंडाळ अविनाश भैरूणगी सातलिंग गोळगोंडा सौ प्रियंका पावली सौ लक्ष्मी म्हेत्रे ( माळी )सौ श्रुती दिवटे व सेवक देसूराव राठोड यांनी परिश्रम घेतले सहल यशस्वी केल्यामुळेप्रशालेचे मुख्याध्यापक रेवणसिद्ध अलीगावे पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले

# वागदरी येथे मराठा योद्धे मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांना आरक्षण मिळवून दिल्याबद्द्ल विजयी जल्लोष

अक्कलकोट/प्रतिनिधीः वागदरी येथे मराठा योद्धे मनोज जरांगे पाटील यांनी मराठ्यांना आरक्षण मिळवून दिल्याबद्द्ल विजयी जल्लोष साजरा करण्यात आला.या प्रसंगी श्री.परमेश्र्वर मंदिर पासून ते शिवबसव चौक एस. टी.स्टँड पर्यंत हलगीच्या निनादा मध्ये विजयी मिरवणूक काढण्यात आली.व स्टँड समोरील छ.



शिवाजी महाराज,महात्मा बसवेश्र्वर महाराज यांच्या प्रतिमेस हार घालून या ठिकाणी छोटेखानी सभा घेण्यात आली.या वेळेला श्री.मनोज जरंगे पाटील यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला.या प्रसंगी गोगाव गावचे माझी सरपंच.श्री.प्रदीप जगताप,श्री.शेळके प्रशाला वागदरीचे चेअरमन श्री.बसवराज शेळके, युवक तालुका काँगेस अध्यक्ष श्री.शिवराज पोमजी, गावचे उपसरपंच श्री.पंकज सुतार, भाजपचे ज्येष्ठ नेते श्री.श्रीशैल ठोंबरे, मराठा समाजाचे युवा व्यक्तिमत्व श्री.सुनील सावंत,भाजपा नेते श्री संतोष पोमाजी,श्री.प्रकाश पोमाजी ,मराठा समाज ट्रस्ट चे अध्यक्ष श्री शिवाजी यशवंत सावंत,श्री.महादेव सोनकवडे मराठा तंटामुक्त उपाध्यक्ष श्री.बाबुराव मोरे,श्री.रमेश सावंत, श्री.एकनाथ माने,सोने व्यापारी कदम यांच्यासह असंख्य समाज बांधव व इतर समाज बांधव,युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी मराठा आरक्षणामुळे आपल्या समाज बांधवांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होणार असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.मराठा योद्धा मनोज पाटील यांनी आपल्या समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अखंड लढा उभा केला,तो लढा येसस्वी केला त्या बद्दल समाज बांधवांनी त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली.तसेच मराठा समाज बांधवांची आरक्षणाची मागणी सरकारने मान्य केल्याबद्दल मुख्यमंत्री श्री.एकनाथ शिंदे,उप मुख्य मंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या सह विद्यमान सरकारचे अभिनंदन करण्यात आले.अश्या प्रकारे वागदरी मध्ये

मराठा आरक्षण मिळाल्या बद्दल समाज बांधव कडून मोठया प्रमाणात जल्लोष साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.महादेव सोनकवडे यांनी केले.

# अक्कलकोट येथे दहावी विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानमालेचे आयोजन

अक्कलकोट/प्रतिनिधीः गौडगाव बु! येथील येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्र्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगदगुरू पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही तालुकास्तरीय दहावी विद्यार्थ्यांसाठी लोकापुरे मल्टीपर्पज. हॉल. अक्कलकोट येथे सकाळी १० ते दुपारी ४.३० पर्यंत व्याख्यानमालेची आयोजन केल्याची माहिती संयोजक तथा मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी यांनी पत्रकाराशी बोलताना माहिती दिली आहे. संस्थेचे विश्र्वस्त शिवाचार्य रत्न श्री.ष.डॉ. जयसिद्धेश्र्वर शिवाचार्य महास्वामीजींच्या कृपाशीर्वादाने व त्यांच्या दिव्य सानिध्यामध्ये गेल्या दहा वर्षापासून व्याख्यानमालेची आयोजन केले जाते दहावी विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाताना त्यांच्यात आत्मविश्र्वास निर्माण व्हावा .गुणवत्ता वाढीसाठी. प्रस्तावित नवीन आराखड्यानुसार कृतीपत्रिका कशी सोडवावी. उत्तर पत्रिका कशी असावी. याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या व्याख्यानमालेत लातूर येथील गणित तज्ञ शिक्षक चिराग व श्रीकांत (IIB latur) इंग्रजीसाठी सोलापूर येथील शहाजी ठोंबरे, अंजली शिरशी,एस .आर जडगे उपस्थित राहून power point presentation (PPT)द्वारे मार्गदर्शन करणार आहे.तरी तालुक्यातील सर्व विद्यार्थ्यांनी व्याख्यानमालेला उपस्थित राहुल लाभ घ्यावा असे अवाहान संयोजकांनी केले आहे.

# इटकूर ग्रामपंचायत येथे लिंगायत समजाचे अमरण उपोषण

ईटकुर/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील इटकुर ग्रामपंचायत समोर दिनांक २६ जानेवारी २०२४ पासून लिंगायत समाजाच्या स्वातंत्र्य स्मशान भूमीच्या मागणीसाठी आमरण उपोषण चालू आहे. आमरण उपोषणाचा आजचा दुसरा दिवस चालू असताना उपोषणा स्थळी कळंबचे बिडिओ यांनी उपोषण कर्त्यांना भेट दिली.

परंतु बीडीओनी दहा दिवसाची मुदत मागितली आहे. परंतु उपोषण कर्त्याचे म्हणणे आहे की ही मागणी आमची एक वर्षापासून चालू आहे. मग तुम्ही एक वर्षभर काय केले. जोपर्यंत पंचायत समितीचा प्रस्ताव तयार होत नाही आणि जिल्हाधिकाऱ्यांना जात नाही आणि या प्रस्तावाची पोहोच आम्हाला जिल्हाधिकाऱ्यांमार्फत जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत आमचे उपोषण चालूच राहील. असे उपोषणकर्त्याचे म्हणणे आहे. उपोषणकर्त्यांच्या खालील मागण्या आहेत.

१) लिंगायत समाजाची स्मशानभूमी उकरून उध्वस्त करणाऱ्या वर कडक कार्यवाही करण्यात यावी.

२) पूर्वपरंपरेनुसार असलेली लिंगायत स्मशानभूमी ही ३७ गुंठे लिंगायत स्मशानभूमी म्हणून




नावावर करण्यात यावी. ३) ईटकुर ग्रामपंचायत कार्यालयाने स्मशान भूमीच्या प्रस्तावावर ३ वेगवेगळे प्रस्ताव सादर करून लिंगायत समाजाची दिशाभूल केल्या कारणास्तव व इतर मागण्यासाठी हे आमरण उपोषण चालू आहे. उपोषणात बिभीषण कुंभार, मोहन क्षीरसागर, भैरवनाथ कुंभार, मैनाबाई कुंभार, सरस्वती एकशिंगे, बाळासाहेब एकशिंगे, शहाजी एकशिंगे, बापू सुरवसे, मनीषा कुंभार, व इतर महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

# भक्तांचा पाठीराखा श्री मतोंबाच्या पदस्पर्शाने नैताळे भुमी झाली पावन पुनित

## यात्रोत्सवात दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी...

निफाड/राजेंद्र थोरात : निफाड तालुक्यातील श्री क्षेत्र नैताळे ही भुमी श्री मतोंबाच्या पदस्पर्शाने पावन पुनित झालेली असून अनेक ठिकाणांहून लोक दर्शनासाठी येत असुन . दर्शन करून भाविक भक्त समाधान व्यक्त करीत श्री मतोबा महाराजां चाभाविक भक्तांना त्याचा महिमा कळावा या साठी हा लेख प्रपंच नक्कीच आपल्याला आनंद देईल. नवनाथ ग्रंथ वाचतांना ज्यांची कथा वाचून हास्य उत्पन्न होते असे नाथ म्हणजेच अडबंगनाथ. त्यांचे जन्म स्थान आपल्या गावापासून फार जवळ आहे. ते म्हणजे चास-देवगाव मार्गे शिर्डी जाताना जरा मधे गेलो कि 'धामोरी' हे ठिकाण लागते. तर या अडबंगनाथांना घेउन जाण्यासाठी (इ.स. १२०० च्या आसपास) श्री मच्छिंद्रनाथ आणि सारेच नाथ येऊन गेल्याचा उल्लेख आहे नवनाथ ग्रंथात आहे.



नवनाथ तिथुन पुढे निघाले असतांना त्यांची तपच्छर्या करणा-या मतोबा महाराजांशी भेट झाली. ज्या ठिकाणी भेट झाली त्याच ठिकाणी त्या तपच्छर्या करणा-या श्री मतोबा महाराजांनी आपल्या सामर्थ्याने नऊ कुंडांची निर्मिती करून त्यांचे चरणकमल त्या पवित्र कुंडातील पाण्याने धुवून त्यांचा आशीर्वाद घेतला. नवनाथांनी त्यांची अपार भक्ती पाहून त्यांना 'साबरी विद्देचे' कवित्व दिले.

पुढे कालांतराने नऊ तळ्याच्या समूहाच्या नावावरून या क्षेत्राला नऊ तळे (नैताळे) म्हणू लागले .

**आगमन आणि वास्तव्य :**

श्री मतोबा हे सातपुडा पर्वत (सध्याचा सापुतारा) ओलांडून या नैताळे या गावी वास्तव्यास आले, त्यांनी या गावचे पाटील पदाजी बोरगुडे यांच्या कडे गुरख्याची चाकरी धरली. श्री मतोबा महाराजांची मुक्या प्राण्यावर फार माया होती, गाई, गुरे चारत-चारत ते विंचू सुध्दा आपल्या अंगा खांद्यावरून खेळवू लागले. त्यांचा हा रोजचा खेळ पाहून त्याची चर्चा गाव व आसपासच्या खेड्यातही होऊ लागली. कुतूहलाने त्यांना पाहण्यासाठी लोक लांबून लांबून येऊ लागले.

त्यांच्या हाताच्या स्पर्शाने विष उतरू लागले, त्यांनी विषारी सर्प दंश झालेले लोक बरे केले. त्यांनी दिलेल्या विभूतीने असह्य रोग बरे होऊ लागले. त्यांच्या कार्याची महिमा वाढत जाऊन पुढे बराच काळ निघून गेल्यावर त्यांनी याच गोठ्यात जिवंत समाधी घेण्याचा प्रस्ताव पदाजी पाटलांकडे मांडला. तेव्हा सर्वांचे अश्रू अनावर झाले पण महाराजांनी सांगितले कि जन्माला आलेला व्यक्ती कधीतरी या जगाचा निरोप घेणारच! मृत्यूच या जगातील प्रखर सत्य आहे. तेव्हा आपण दुःख मानण्याचे काहीच कारण नाही. माझा कार्यकाळ संपलेला आहे. आता हा वारसा गावक-यांनी जपायचा आहे.

त्यांनी पौष पौर्णिमेचा दिवस निवडला आणि त्यांनी याच दिवशी शेष नागाला साक्षी ठेऊन जिवंत समाधी घेतली. पुढे याच जागी त्यांचे मंदिर बनले, तेव्हापासून तर आज पर्यन्त दरवर्षी पौष पौर्णिमेला त्यांचे पुण्य स्मरण म्हणून यात्रोस्तव भरतो तो १५ दिवस चालतो.

महाराजांच्या प्रतिमेची पहाटे विधिवत पूजा केल्यानंतर प्रतिमेच्या मिरवणुकीसाठी बैल गाडीच्या रथ सजवला जातो.खानदेशातून सुध्दा भाविक आपली बैलजोडी बाबांच्या रथाला जुंपण्यासाठी आणतात, त्याला ओढण्यासाठी २१ बैल जुंपलेले असतात. हे दृश्य पहाण्यासाठी भाविक मोठ्या प्रमाणावर गर्दी करतात. रथापुढे जिल्यातील नामवंत बॅण्डची पथके हजेरी लावतात. यात्रेत विविध प्रकारची दुकान असतात. खाद्यपदार्थ असतात. रहाट पाळणे असतात. भांड्यांची सुध्दा दुकान असतात. यात्रोत्सवकाळात नैताळे ग्रामस्थ.व यात्रा कमिटी चेवतीने भाविक भक्तांना कुठल्याही प्रकारची अडचण येऊ नये यासाठी काळजी घेतली जात असुन यात्रा उत्सवात आलेल्या भाविकांच स्वागत केले जाते तसेच निफाड निफाड पोलीस स्टेशन च्या वतीने कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे हा यात्रोत्सव सुरू झाला असुन आपणही एकदा जाऊन दर्शन घेऊन नतमस्तक व्हावे. साजरे करूया..